बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क साधा
* संपर्क *
मो. 9421505122

https://manmadthinagi.com/news

# मनमाड साप्ताहिक ठिणगी

संस्थापक संपादक : स्व.प्रकाशजी गोयल  संपादक : तुषार गोयल

RNI Regd.No.91032/90 (Delhi) | वर्ष ३४ वे | अंक ४ था. | वार : रविवार दि.१२ फेब्रुवारी २०२३ | पाने ४ | किमत ५ रू.



22k 916
हॉलमार्क सर्टीफाईड बिनघटीचे दागिने शुध्दता आणि विश्वास
100% BIS Approved Hallmarked Jewellery
कंचन ज्वेलर्स
सराफ बाजार, मनमाड
तुषार गोयल ९४२१५०५१२२
दिपक गोयल ९९६०९३१४१४




## शिवजयंतीनिमित्त मनमाड मराठी पत्रकार संघाच्या वतीने मातिचे गड किल्ले बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन

मनमाड : 'चला मग किल्ला बनवूया, मातीशी नाते जोडू या' हे ब्रीद वाक्य घेऊन आगामी शिवजयंती निमित्त नांदगांव मनमाड मराठी पत्रकार संघाच्या वतीने शिवरायांच्या गड किल्ल्यांची प्रतिकृतीचे मातीचे किल्ले बनविण्याची स्पर्धा आयोजित केली असून मनमाड शहरातील नागरिकांनी या विनामूल्य स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

येत्या १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी होत आहे. त्या निमित्ताने मनमाड शहरात शिवजयंतीनिमित्त गड किल्ले उभारणी स्पर्धेचे आयोजन नांदगाव मनमाड पत्रकार संघातर्फे आयोजित करण्यात आले आहे. 'चला मग किल्ला बनवूया, मातीशी नाते जोडू या' हे ब्रीद वाक्य घेऊन शिवजयंती निमित्त शिवरायांचे गड किल्ले मातीत बनविण्याची स्पर्धा घेण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या कारकीर्दीत स्वराज्यासाठी महाराष्ट्रभर विविध जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन गड किल्ले उभारले, गड किल्ले जिंकले त्यांची माहिती येणाऱ्या पिढीला व्हावी या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी १७ फेब्रुवारी पर्यंत या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपली प्रवेशिका त्यात आपले नाव, पत्ता, मोबाईल नंबर, शिवरायांचा कोणता किल्ला बनवणार त्याचे नाव यासह इतर माहिती असलेली प्रवेशिका पत्रकार उपाली परदेशी (९२२६७२७८७७), योगेश म्हस्के (८१४९८८८५५४), मिलिंद वाघ सर (९२७०८८५३५०) या क्रमांकावर पाठवायच्या आ-हेत. या स्पर्धेसाठी काही नियम अटी ठेवण्यात आल्या आहेत. स्वतः च्याच घरी पर्यावरण पूरक शिवरायांचे मातीचे गड किल्ले बनवण्याचे आहेत. पर्यावरण पूरक गडकिल्ले मातीत बांधणे, छत्रपती शिवरायांच्या किल्ल्यांची प्रतिकृती सादर करावी, प्रवेश विनामूल्य असून प्रवेशिका १७ तारखेपर्यंत पाठवणे, नाव नोंदणी अनिवार्य आहे. परीक्षण २० फेब्रुवारी रोजी घरी जाऊन करण्यात येईल, बक्षीस वितरण शिवजयंती झाल्यानंतर करण्यात येईल, स्पर्धा शहर पातळीवर खुली राहील, परिक्षणाचे मुद्दे गट कार्य नियोजन, नावीन्य व कल्पकता, किल्ले विषयाची माहिती किल्ल्याची सुबकता असे असणार आहे. यशस्वी प्रथम, द्वितीय, तृतीय आणि तीन उत्तेजनार्थ स्पर्धकांना आकर्षक सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक, प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते दिले जा-तील अशी माहिती नांदगांव मनमाड मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल खरे यांनी दिली.

## वीणाताई आहेर व आकांक्षा व्यवहारेला राष्ट्रीय खेलो इंडिया वेटलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक

### साईराज परदेशीला कांस्यपदक




मनमाड : इंदोर मध्यप्रदेश येथे सुरू असलेल्या पाचव्या राष्ट्रीय खेलो इंडिया वेटलिफ्टिंग स्पर्धेची सुरवात ४० किलो वजनी गटात वीणाताई संतोष आहेर ने सुवर्णपदक मिळवीत केली ५७ किलो स्न्याच ७२ किलो क्लीन जर्क असे १२९ किलो वजन उचलून वीणाताई आहेर हिने नवीन राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक पटकावून ऐतिहासिक कामगिरी केली तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडू आकांक्षा किशोर व्यवहारे हिने ४५ किलो वजनी गटात ६७ किलो स्न्याच ७७ किलो क्लीन जर्क एकूण १४४ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले. वीणाताई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आकांक्षा श्री गुरू गोबिंद सिंग हायस्कुलच्या विद्यार्थिनी आहे. जय भवानी व्यायामशाळेच्या व के.आर.टी विद्यालयाच्या साईराज राजेश परदेशी याने ७३ किलो वजनी गटात ११५ किलो स्क्याच व १४७ किलो क्लीन जर्क असे २७२ किलो वजन उचलून चुरशीच्या लढतीत कांस्यपदक पटकावले. यशस्वी खेळाडूंना छत्रे विद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक प्रविण व्यवहारे व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक तृप्ती पाराशर यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

जय भवानी व्यायामशाळेचे अध्यक्ष डॉ.विजय पाटील मोहन अण्णा गायकवाड डॉ.सुनील बागरेचा, प्रा.दत्ता शिंपी, छत्रे विद्यालयाचे आधारस्तंभ पी.जी. धारवाडकर, अध्यक्ष पी.जे.दिंडोरकर, सचिव दिनेश धारवाडकर, संचालक नाना कुलकर्णी, प्रसाद पंचवाघ, मुख्याध्यापक आर.एन.थोरात, उपमुख्याध्यापक संदीप देशपांडे, पर्यवेक्षिका सौ.पोतद-ार एस.एस., के.आर.टी.विद्यालयाचे प्राचार्य मुकेश मिसर, मुख्याध्यापक दीपक व्यवहारे, श्री गुरू गोविंद सिंग हायस्कुल चे अध्यक्ष बाबा रणजित सिंहजी, प्राचार्य सदाशिव सुतार, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण पाटील, क्रीडा संचालक प्रा.संतोष जाधव, महाराष्ट्र वेटलिफ्टिंग संघटनेचे उपाध्यक्ष संतोष सिंहासने, सचिव प्रमोद चोळकर यांनी अभिनंदन केले.

## पाहिजेत

साप्ता.मनमाड ठिणगी तसेच ठिणगी न्यूज पोर्टल माध्यमांचे प्रतिनिधी तसेच जाहिरात प्रतिनिधी नेमणे आहेत.
वृत्तपत्र क्षेत्रातील अनुभवी उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
**दिपक गोयल** (जाहिरात व्यवस्थापक)
सराफ बाजार, मनमाड मो.९९६०९३१४१४

## आमदार संपर्क कार्यालयात संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती साजरी



मनमाड : संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती आज आमदार संपर्क कार्यालय मनमाड येथे साजरी करण्यात. आमदार सुहास (आण्णा) कांदे यांनी संत शिरोमणी रोहिदास म हाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले.

याप्रसंगी सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. राजाभाऊ अहिरे, राजेंद्र पगारे, सुनील हांडगे, साईनाथ गिडगे, मयुर बोरसे, योगेश इमले, असिफ पहिलवान, नितीन पांडे, जय फुलवानी, दिलीप नरवडे, दिनकर धीवर, संजय निकम, बबलू पाटील, सचिन दराडे, कैलास आहिरे, चंद्रकांत कातकडे साहेब, सचिन शिरुड, महेंद्र शिरसाठ, कैलास अहिरे दिलीप नरवडे, अमजद पठाण, संतोष अहिरे, रविंद्र घोडेस्वार, उमाकांत राय, पी आर निळे, भगवान भोसले, संजय भालेराव, प्रकाश चावरिया, शेखर अहिरे, पप्पू दराडे, बाळू मोरे, बाबा शेख, सुशील खरे, राजेंद्र भाबड, प्रमोद आहीरे, गुरू निकाळे आदी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, तुषार प्रकाश गोयल यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव येथे छापून पूनम पब्लिसिटी गोयल बिल्डींग, मनमाड ४२३ १०४, जिल्हा नाशिक येथे प्रसिध्द केले. मो.९४२१५०५१२२ (मनमाडच्या न्यायकक्षेत) **संपादक : तुषार प्रकाश गोयल**

BIS 100% Hall Marked Jewellery

आमच्याकडे कोणतेही BIS प्रमाणित ९१६ हॉलमार्क दागिने मोडताना घट येत नाही.

**कोणत्याही आणि कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका.**

* हॉलमार्क नसलेले दागिने खरेदी करणे नुकसानदायक आहे.
* हॉलमार्क नसलेले दागिने खरेदी केल्यामुळे सोन्याच्या शुध्दतेत फसवणुक होऊ शकते.
* 22 K 916 हॉलमार्कच्या दागिन्यांना डाग नावाचा प्रकार नसतो.
* फक्त 916 22 K मार्किंग म्हणजे हॉलमार्क नसतो. त्यावर BIS चा लोगो सुध्दा असला तरच तो दागिना ओरिजनल हॉलमार्क असतो.
* BIS हॉलमार्क दागिने खरेदी करण्याचे फायदे.
* हॉलमार्क असलेले दागिने खरेदी केल्यामुळे सोन्याच्या शुध्दतेत फसवणूक होत नाही.
* भारत सरकार प्रमाणित लॅबमध्ये दागिन्यांची पारख होते व दागिना शुध्द असेल तरच त्याच्यावर हॉलमार्किंग केली जाते.
* BIS 916 22 K हॉलमार्क दागिने मोडतांना कसलीही डागाची घट कापली जात नाही.
* हॉलमार्क सोन्याच्या दागिन्यांना मजुरी ही प्रती ग्रॅममागे लागते. ती ही कॅरेट च्या योग्य भाव प्रमाणे. आणि तीच आधी समजावून घ्या. शंका असल्यास आम्हाला संपर्क करा.
* २० कॅरेट, २२ कॅरेट हॉलमार्क सोन्याचे भाव आणि २३ कॅरेट, २४ कॅरेटसोन्याचे भाव हे हे वेगवेगळे असतात.
* नवीन हॉलमार्क सक्तीचे कायदे हे ग्राहक हितासाठीच बनलेले आहेत.
* साध्या (estimate, qotation लिहिलेले) पावतीवर व्यवहार केल्यास तुमची फसवणूक अटळ आहे. GST चे पक्के बिल मागून घ्या.
* दागिने खरेदी खरेदी केल्यावर GST चे पक्के बिल मागून घ्या आणि ते मिळत नसेल तर तेथून दागिने खरेदी करू नका. अन्यथा तुम्ही फसवले जाऊ शकता.
* तुमचे याआधी खरेदी केलेले दागीने सुध्दा योग्य भावाप्रमाणे मोडले जाऊ शकतात ते मोडता येणार नाही. घट जास्त येईल. कमी भाव मिळेल हा अपप्रचार केला जात आहे.
* जुने दागीने हॉलमार्कचे नसतील तरीही त्यांची किंमत कमी होत नाही हे लक्षात ठेवा.
* रोजचे सोने-चांदीचे भाव जाणून घेण्यासाठी आम्हास संपर्क करा.



**कंचन ज्वेलर्स**
४५७, सराफ बाजार, मनमाड

**दिपक गोयल**
सचिव : सराफ सुवर्णकार असो. मनमाड
सरचिटणीस : भाजपा मनमाड शहर
मो.9960931414

# कंचन ज्वेलर्स- दिवाळी - नाताळ धमाका ऑफर कुपन सोडत; विजेत्यांना बक्षीस वाटप







मनमाड : मनमाड शहरात सुमारे सात दशकांपासून शुद्धता आणि विश्वासाची परंपरा अबाधित राखत ग्राहकांच्या पसंतीस उतरलेल्या गोयल बंधू यांच्या मे.कंचन ज्वेलर्स तर्फे यंदा दसरा - दिवाळी - नाताळ निमित्त रूपये ३००० च्या खरेदीवर मोफत कूपन योजना राबविण्यात आली होती. या योजनेची सोडत ३० जानेवारी २०२३ रोजी साई प्रसन्न लॉन्स येथे उपस्थित मान्यवर ग्राहकांच्या लहान बच्चे कंपनीच्या शुभ हस्ते काढण्यात आले. पहिल्या पाच भाग्यवान ग्राहकांची सोडत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले मनमाड शहर व्यापारी महासंघ अध्यक्ष राजेंद्र पारीक, नांदगाव मनमाड मराठी पत्रकार संघाचे तालुकाअध्यक्ष अमोल खरे, गावकरीचे वार्ताहर नरहरी उंबरे तसेच लोकमत चे प्रतिनिधी अशोक बिद्री यांच्या शुभ हस्ते काढण्यात आले. शेकडो ग्राहकांच्या साक्षीने संपन्न झालेल्या या सोडतीला कंचन ज्वेलर्स चे मनमाड शहरासह ग्रामीण भागातील ग्राहकांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कंचन ज्वेलर्स चे संचालक दीपक गोयल यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद बोथरा यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी कंचन ज्वेलर्स चे संचालक तुषार प्रकाश गोयल, दीपक प्रकाश गोयल, पद्माकर पगारे, सागर शिदलींग, तुषार आव्हाड, प्रमोद केकाण आदींनी परिश्रम घेतले.

कंचन ज्वेलर्स- दिवाळी - नात-ाळ धमाका ऑफर कुपन सोडतीमध्ये ५० बॅग विजेते ग्राहक पुढील प्रमाणे- खुशी गडवे, प्रणव खरे, दिलीप म्हसू त्रिभुवन, सुनील केकाण, अनिकेत इंगोले, मुस्कान निसार सैयद, शाहिस्ता शेख जावेद, गोरखनाथ राम चंद्र आहिरे, जनार्दन दत्तू कातकडे, मथुराबाई नाथभंजन, अनुश महाले, माया पाटील, हिराबाई खुरसणे, प्रकाश नायडु, मनोज ढोमणे, अजय पगारे, प्रमोद वेताळ, दादु आव्हाड, पुष्पा नाना जाधव, अनिल इंगोले, मिनाबाई खरे, कल्पना गायकवाड, सिद्धी राहुल सानप, बाळू सखाराम बीडगर, आराध्या गोराडकर, रमेश भिका गायकवाड, समरीन नावीद खान आरेफा सोनावाला, पदमा भारत होन, सरफराज शेख, प्रियंका चेतन जाधव, धिरज चावरीया, राजु भागवत पाटील, आकांक्षा भगवान शिरसाठ,

शाम खलसे, माया पाटील, अण्णासाहेब चिमाजी गोरे, पवन संदिप खैरनार, प्रतिक्षा प्रमोद पवार, सिध्दार्थ आहीरे, अक्षय सूर्यभान सानप, पुजा संतोष भालेराव, राहुल जगताप, शिनु निकाले, वार्जे नवनाथ, नईम सैय्यद, अलका संजय सांगळे, रंजना देवचंद पवार, उमेश जैन, सुनिल रंगनाथ पवार.

स्मार्ट वॉच ५ नग पाच भाग्यवान ग्राहक- ग्राहकाचे नाव - आकांक्षा भगवान शिरसाठ मनमाड, दिपक केदारे, मनमाड, आनंदा शिरसाठ, काजल कुसमाडे, दिपक आहेर

मिक्सर पाच नग - भाग्यवान ग्राहक, ज्योती कांबळे, मनमाड , पार्वताबाई साळवे मनमाड, अनिता शिवनाथ झाल्टे नगरचौकी, सुरेश पिठे मनमाड, दत्तु खैरे निमुन.

टी व्ही ४० इंच प्रथम बक्षीस - सौ.सरला धात्रक, मनमाड

विवो मोबाईल, द्वितीय बक्षीस - चित्रा गरूड, आंबेडकर चौक मनमाड

फ्रिज तृतिय बक्षीस - आकांक्षा भगवान शिरसाठ मनमाड

चतुर्थ बक्षीस ३२ इंच टीव्ही- अलका केदारे, मनमाड

पाचवे बक्षीस - वॉशिंग मशिन, प्रियंका प्रविण आहेर

टी टेबल विजेते ग्राहक - अब्दुल शेख, बेबीबाई नाना सोळसे, नामदेव झिप्रू धोपरे, किशोर शर्मा, प्रभाकर खडताळे

हेडफोन नग ५ पाच भाग्यवान ग्राहक - अर्चना संभेराव, अक्षय सुर्यभान सानप, मंजु जाधव, प्रकाश नायडु, काजल आकाश निकाळे

किचन सेट ५ नग - जिजाबाई शिंदे, राहुल खरे, राकेश पटाईत, माया पाटील, तुळशिराम मार्कंड.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे माता रमाई यांना अभिवादन



मनमाड : माता रमाई यांना १२५ व्या जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे मिलिंद सामाजिक सांस्कृतिक मंडळ व भारती बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमानाने अभिवादन करण्यात आले. यावेळी शहरातून मिरवणूक देखील काढण्यात आली. माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन समाजसेवक विलास कटारे, माजी नगरसेविका नूतन पगारे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश गणेश धात्रक, प्रवीण नाईक, प्रमोद पाचोरकर, विजय मिश्रा, संतोष बळीद, वंचित बहुजन आघाडीच्या शहराध्यक्षा आम्रपाली निकम, कैलास शिंदे, संदीप खरे, बापू सव्वाखंडे, वाल्मीक गरूड, संदीप घोडके, अवी कटारे, निशाण संसारे आदींसह भारतीय बौद्ध महासभेचे कार्यकर्ते, महिला, नागरिक उपस्थित होते. महामाया महिला मंडळाच्या प्रमुख लताबाई निकाळे, सुवर्णा कटारे, बेबी शिंदे, उज्वला कटारे, आशाबाई पवार, छायाबाई निकाळे, मुमताज अन्सारी, मलिका गोरे, अश्विनी खरे सुनंदाताई गरूड, हिराबाई मोकळ, सविता भालेराव, शिवानी कटारे, संगीता उबाळे, मेघा केदारे, सीमा सोनवणे, अर्चना कांबळे आदी महिलांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

# पित्याच्या मृत्यूनंतर अस्थी विसर्जित न करता घराजवळ केली दफन वृक्ष लागवड करीत मुलांनी समाजापुढे ठेवला एक आदर्श

मनमाड - पिताच्या मृत्यूनंतर अस्थी व रक्षा नदीत विसर्जित करण्याच्या प्रथेला फाटा देत मनमाडच्या बुधलवाडी भागातही केदारे कुटुंबियांनी घराजवळ खड्डा करून अस्थी व रक्षा दफन करत त्याच ठिकाणी वृक्ष लावून पिताच्या आठवणी कायमच्या जतन करत समाजापुढे आदर्श घालून दिला.




मनमाडच्या बुधलवाडी भागात राहणारे काळू दगाजी केदारे यांचे ८८ वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, सहा मुले, सुना, नातवंडे व पणतू असा मोठा परिवार आहे. त्यापैकी अरूण केदारे व राजू केदारे हे परिवर्तनवादी चळवळीत कार्यरत असून वडिलांचे निधन झाले. निधनानंतर आपल्याकडे अस्थी विसर्जन करण्याची प्रथा आहे. मात्र त्यामुळे जल प्रदूषण होते. हा प्रथेला फाटा देत त्यांनी वडिलांच्या अस्थी विसर्जित न करता घराजवळच खड्डा करून अस्थी खड्ड्यात दफन करून त्यांच्या स्मृतीनिमित्त वृक्ष लागवड करण्याची संकल्पना मांडली त्यास कुटुंबातील सदस्यांनी सहमती दर्शविली.

जलदान व पुण्यामोदन कार्यक्रमाच्या दिवशी घराच्या प्रांगणात सर्व आप्तेष्टांच्या उपस्थित घराज-वळ खड्डा करून दिवंगत काळू केदारे यांच्या अस्थी दफन करून त्या ठिकाणी वृक्ष लागवड करून वडिलांच्या स्मृती जपल्या.

पाण्यात अस्थी विसर्जन केल्याने पाण्याचे प्रदूषण होते. तो रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला त्याचबरोबर वृक्ष लागवड केल्याने निसर्गाचा समतोल राखला जातो. झाडापासून ऑक्सिजन मिळते व निसर्गचक्रही अबाधित राहते.आणि झाडापासून फळे व फुले मिळत असल्याने वडील कायम स्मरणात राहतील... - असे मत सामाजिक कार्यकर्ता, मुलगा अरूण काळू केदारे यांनी व्यक्त केले.

# नाशिक जिल्हातील बाजार समितीच्या निवडणुकीचा बिगुल वाजला

मनमाड : नांदगाव मनमाड सह नाशिक जिल्हातील बाजार समित्याच्यां बिगुल अखेर वाजला असून नवीन सुधारीत मतदान याद्यांचा कार्यक्रम जाहीर झाला असून २७ फेर्बुवारी रोजी नवीन प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.

गेल्या तीन वर्षापासून लांबणीवर पडत असलेल्या बाजार समितीच्या निवडणुका ३० एप्रील २०२३ पर्यत घेण्याचे आदेश खंडपीठाने राज्य शासनाला दिलेले आहे. तसे प्रतिज्ञापत्र राज्य शासनाने कोर्टात दाखल केले आहे. त्यामुळे ३ एप्रिल पुर्वी निवडणुका होणार हे निश्चित झाले होते. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने बाजार समित्यांच्या सुधारित मतदार यादी बनविण्याचा कार्यक्रम जा-हीर केला असून १० ते २४ फेब्रुवारी नवीन निवडून आलेल्या सदस्याची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे २७ फेब्रुवारी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करणे. २७ फेब्रुवारी ते ८ मार्च प्रारूप मतदार यादीवर हरकती घेणे. ८ ते १७ मार्च प्राप्त हरकती वर अंतीम निर्णय घेणे. २७ मार्च अंतीम मतदार यादी प्रसिद्ध करणे. असा कार्यक्रम घोषीत झाला आहे.

# मनमाड रेल्वे स्थानकात वंदे भारत एक्स्प्रेसचे जल्लोषात स्वागत





मनमाड : वंदे भारत एक्सप्रेस चे शुक्रवारी सायंकाळी मनमाड रेल्वे स्थानकात ढोलताशांचा गजरात आणि नागरिकांच्या टाळ्यांचा कडकडाटात मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री ना.डॉ. भारती पवार, आमदार सुहास कांदे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला. भुसावळ विभागातील वरिष्ठ रेल्वेचे अधिकारी मनमाड शहरातील सर्व स्थरातील नागरिक, सर्व राजकीय पक्ष, संघटना, सामाजिक संस्था संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. वंदे भारत एक्सप्रेसने प्रवास म्हणजे विमान प्रवासाची सुखद अनुभूती असल्याची प्रतिक्रिया प्रवाशांनी व्यक्त केली. सुसज्ज अत्याधुनिक डबे असलेली वंदे भारत ट्रेन मध्ये अनेक निमंत्रक मान्यवरांनी गाडीतून शिर्डी पर्यंत प्रवास करून सुखद प्रवासाचा अनुभव घेतला. यावेळी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री नामदार डॉ. भारती पवार, आमदार सुहास कांदे यांनी गाडीचे स्वागत केले. यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला. यावेळी आमदार सुहास कांदे यांनी स्वतः जोरदार घोषणाबाजी केल्याने सर्वांचे लक्ष त्यांच्याकडेच होते.

मनमाड जंक्शन रेल्वे स्थानकात या गाडीला केवळ तांत्रिक थांबा आहे. व्यावसायिक थांबा अद्याप दिलेल्या नाही. या रेल्वे स्थानकाचे जंक्शन महत्त्व लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने वंदे भारत एक्सप्रेस ला मनमाड स्थानकात व्यावसायिक थांबा द्यावा, अशी मागणी या निमित्ताने केली जात आहे.

सीएसएमटी - शिर्डी वंदे भारत रेल्वे गाडीला एकूण १६ डब्बे असून ११२८ प्रवासी क्षमता आहे. पहिल्या दिवशी भुसावळ विभागाने ६०० सोव्हेनीर मोफत तिकिटे दिली होती. यामध्ये १५० सरकारी शाळेतील मुले, त्यांचे पालक आणि शिक्षक, १०० प्रसार माध्यम, १२५ आमदार, खासदार राजकिय मान्यवर, १२५ विविध मान्यवर जसे की डॉक्टर, इंजिनियर, उद्योग, रेल्वे ग्राहक आदि आणि १०० रेल्वे प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

# करंजवण-मनमाड पाणीपुरवठा योजनेचे मुख्यमंत्र्याच्या हस्ते सोमवारी भूमिपूजन





मनमाड : गेल्या चार दशकांपासून रखडलेला मनमाडचा पाणीप्रश्न अखेर मिटणार असून मनमाडवरचा पाणीटंचाईचा कलंक पुसला जाणार आहे हा ऐतिहासिक क्षण सोमवार दिनांक १३ फेब्रुवारी रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ३११ कोटींच्या हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे करंजवन पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन आणि एमआयडीसीची ऐतिहासिक घोषणा होणार आहे. आमदार सुहास कांदे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे मनमाड चे हे दोन्ही जिव्हाळ्याचे प्रश्न मार्गी लागणार आहेत.

मनमाड शहराचा पाणीप्रश्न गेल्या चाळीस वर्षांपासून रखडलेला होता. अनेकांनी प्रयत्न केले पण त्याला यश आले नाही. नांदगांव तालुक्याचा आमदार म्हणून माझी जबाबदारी असल्याने मी मनमाड शहराचा पाणीप्रश्न मिटावा यासाठी प्रयत्न केले. त्याला यश आले असून मनमाडसाठी जीवनदायिनी असलेली करंजवन पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास जात असल्याचा आनंद आहे. या योजनेचा ऐतिहासिक सोहळा १३ फेब्रुवारी रोजी होणार आहे. येथील महर्षी वाल्मिकी क्रीडा संकुलावर त्याचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या ऐतिहासिक योजनेचे उद्घायन होणार आहे. या सोहळ्याला उद्योग बंधारे व खनीकर्म तथा पालकमंत्री दादा भुसे, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री तानाजी सावंत, उद्योग मंत्री उदय सामंत, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ भारती पवार, बाळासाहेबांची शिवसेनेचे राज्य सचिव भाऊसाहेब चौधरी, खा. डॉ.श्रीकांत शिंदे हे उपस्थित राहणार आहे. अगदी भव्य दिव्य असा हा ऐतिहासिक सोहळा होणार आहे. मनमाडच्या नागरिकांनी या सुवर्ण सोहळ्याचे साक्षीदार व्हावे असे आवाहन आमदार कांदे यांनी केले आहे.

# नांदगाव मनमाड मराठी पत्रकार संघाच्या वतीने ना.खा.भारतीताई पवार यांना निवेदन




मनमाड : केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री, डॉक्टर भारती पवार यांना नांदगाव मनमाड मराठी पत्रकार संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले. मनमाड येथील पत्रकार कार्यालयात खासदार भारती पवार आले असता हे निवेदन देण्यात आले. मनमाड शहरात पत्रकार कॉलनी व पत्रकार भवन बांधण्यात यावे असे आशयाचे निवेदन पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष अमोल खरे,जेष्ठ पत्रकार आप्पा परदेशी, नरेश गुजराथी, सतीश शेखदार, अनिल निरभवणे, नरहरी उंबरे, निलेश वाघ, उपाली परदेशी, नाना आहिरे, अफरोज अत्तार, अनिस शेख, आदी पदाधिकारी, पत्रकार बांधव उपस्थित होते.

नांदगाव मनमाड मराठी पत्रकार संघ ही मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न संस्था आहे. धर्मदाय आयुक्त, नासिक यांच्याकडे नोंदणी झालेली अधिकृत आणि मान्यताप्राप्त संस्था-संघटना आहे. मनमाड शहरातील व नांदगाव तालुक्यातील पत्रकारांसाठी मनमाड येथे पत्रकार कॉलनी व पत्रकार भवन उभारण्यात यावी असे आप्पा परदेशी, नरेश गुजराथी व अमोल खरे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# मनमाड बार असोसिएशन अध्यक्षपदी ॲड.किशोर सोनवणे




मनमाड : येथील मनमाड कोर्टाच्या बार रूम मध्ये गुरूवारी मनमाड बार असोसिएशनची निवडणुक होवून त्यात प्रसिद्ध ज्येष्ठ वकील किशोर एकनाथ सोनवणे यांची ४५ पैकी ३१ मते मिळवून बहुमताने अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

या निवडणुकीत बार असोसिएशनच्या सर्वच्या सर्व म्हणजे ४५ सदस्यांनी मतदान केले. सचिवपदी ॲड.शशिकांत माधवराव व्यवहारे यांना २३ मते मिळाल्याने यांची बहुमताने निवड जाहिर करण्यात आली. सहसचिव पदी ॲड.मुरलीधर गणेश बापट यांना २६ मते मिळाल्याने त्यांची निवड झाली. खजिनदार पदासाठी झालेल्या मतदानात ॲड.संजय शांतीलाल गांधी व ॲड.वाल्मीक सुखदेव जगताप या दोघांनाही समसमान २२ मते मिळाली. त्यामुळे चिठ्ठी टाकून ॲड.संजय गांधी यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष पदासाठी ॲड. सुरेश पी. पाटील यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात आले.

निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. वळवी तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. अशोक लाठे यांनी काम पाहिले. नुतन कार्यकारिणीचे शहरांतील सर्व थरांतील नागरीकांनी अभिनंदन होत आहे. साप्ता. ठिणगी परिवारातर्फे अभिनंदन !

# मै भी डिजिटल ४.० मोहिमेअंतर्गत पथविक्रेत्यांना कर्ज वितरीत

## शहरात कौशल्य प्रशिक्षण केंद्र उभारणार : आमदार सुहास कांदे



मनमाड : दि.९ फेब्रुवारी २०२३ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया, मनमाड मुख्य शाखा या कार्यालयात आमदार सुहास (आण्णा) कांदे यांचे अध्यक्षतेखाली आणि मनमाड नगर परिषद मुख्याधिकारी डॉ.सचिनकुमार पटेल मार्गदर्शनाखाली मनमाड नगरपरिषदमार्फत राबवल्या जाणाऱ्या केंद्र शासनाच्या दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) प्रधान मंत्री आत्मनिर्भर निधि (PM-SVANid-hi), प्रधान मंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग (PMFME) अशा विविध प्रकारच्या लाभाच्या योजना मनमाड शहरातील गरीब व गरजू सुशिक्षित बेरोजगार लाभार्थ्यांना मनमाड नगरपरिषद आणि स्टेट बँक ऑफ इंडिया, मनमाड आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मनमाड यांचे सयुक्त विद्यमाने मै भी डिजिटल 4.0' या प्रशिक्षण मोहिमेअंतर्गत २०० पेक्षा जास्त पथविक्रेते आणि काही स्वयंरोजगार कर्ज वितरित केलेल्या लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी आमदार सुहास (आण्णा) कांदे, म.न.पा.प्रशासक डॉ.सचिनकुमार पटेल, यांचे हस्ते स्टेट बँक ऑफ इंडिया मनमाड व्यवस्थापक विकास कुलकर्णी यांचे मार्फत २० पथविक्रेत्यांना प्रत्येकी १००००/- आणि स्वयंरोजगार वैयक्तिक कर्ज घटकाअंतर्गत ८ लाभार्थ्यांना प्रत्येकी रूपये २ लक्ष कर्ज व २ लाभार्थयाना रिक्शा वितरित करण्यात आले तर सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मनमाड व्यवस्थापक अनिरूद्ध भालेराव यांचे मार्फत ८ पथविक्रेते यांना प्रत्येकी १००००/- आणि स्वयंरोजगार वैयक्तिक कर्ज घटकाअंतर्गत ५ लाभार्थ्यांना प्रत्येकी रूपये २ लक्ष कर्ज वितरित करण्यात आले आहे.

याप्रसंगी कार्यक्रमाची प्रस्तावना नगर परिषद शहर व्यवस्थापक संदीप आगोणे यांनी केली, तर शिवसेना महिला आघाडीच्या नेत्या सौ.अंजुमताई कांदे यांनी महिलांच्या शास्वत रोजगाराविषयी मार्गदर्शन केले. माजी नगरसेवक तथा शिवसेना शहर प्रमुख मयूर बोरसे यांनी शहाराच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी सध्या कार्यान्वित असणारी करंजवन पाणीपुरवठा योजना बाबत माहिती दिली. शिवसेना तालुका प्रमुख साईनाथ गिडगे यांनी मनमाड शहरात लवकरच MIDC महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मार्फत उद्योग व्यवसाय सुरू होणार असल्याबाबत मार्गदर्शन केले. तर जिल्हा संसाधव व्यक्ति श्रीमती सीमा वानखेडे यांनी प्रधान मंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग (PMFME) याबाबत माहिती दिली. डॉ.सचिनकुमार पटेल, मुख्याधिकारी तथा प्रशासक, मनमाड नगरपरिषद यांनी नगरपालिका मार्फत राबण्यात येणाऱ्या सर्व लाभाच्या योजना आणि शहारच्या सर्वांगीण विकास प्रणालीबाबत माहिती दिली. शेवटी अध्यक्षीय भाषणात आमदार सुहास (आण्णा) कांदे यांनी शहारच्या रोजगाराच्या शास्वत योजना आणण्याची घोषणा केली. मनमाड शहरात भव्य कौशल्य प्रशिक्षण केंद्र उभारून त्यातून महिलाना प्रशिक्षण देऊन मोठ्या प्रमाणावर उत्पन्नाचे साधन निर्माण करून देणार असल्याचे आश्वासन दिले. महिला बचत गटांना उत्पादित मालास स्थानिक पातळीवर बाजारपेठ उपलब्ध करून दिले जाईल असे संगितले. आभार सौ.रेखा गांगुर्डे, समूह साधन व्यक्ति, न.प.मनमाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी न.पा. कार्यालयीन अधिक्षक अशोक पाईक, कृषि कर्ज, एसबीआय बँक ज्ञानेश्वर जाधव, योजनेचे समुदाय संघटक श्रीवर्धन कुशारे, अर्चना आव्हाड, शिवसेना उपप्रमुख सुनील हांडगे, शिवसेना संघटक श्रीम.विद्या जगताप, श्रीम. संगीता बागूल, शिवसेना शहर अधिकारी योगेश इमले व आसिफ शेख, सामाजिक कार्यकर्ते दिलावर शेख आणि मीर अहेमद यांनी सहकार्य केले.